# प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

'मराठी सत्तेचा उदय' ही केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर हिंदुस्थानच्या इतिहासातील एक गौरवशाली घटना म्हणून ओळखली जाते. १६०० ते १८०० या काळातील मराठयांच्या घडामोडी या हिंदुस्थानच्या इतिहासावर परिणाम घडवून आणणाऱ्या ठरल्या. म्हणूनच या काळातील हिंदुस्थानच्या इतिहासाचा अभ्यास मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाशिवाय पूर्ण होऊच शकत नाही. मराठयांच्या इतिहासाने परकीय विद्वांनाबरोबरच परप्रांतीय विद्वानांनाही मोहित केल्याचे दिसून येते. म्हणूनच मॅलट, एम.जी.स्प्रेंगल, ग्रॅट डफ यांच्याबरोबरच रविंद्रनाथ टागोर, डॉ.सुरेंद्रनाथ सेन व जदुनाथ सरकार या विद्वानांनीही मराठयांच्या इतिहासाचा कसून अभ्यास करण्याचा प्रयत्न केल्याचा दिसतो. केवळ परकीय व परप्रांतीय नव्हे तर अनेक महाराष्ट्रीयन विद्वानांनीही मराठयांच्या इतिहासास आवश्यक असणाऱ्या साधनांची जमवाजमव करण्यात, साधनांचा चिकित्सक अभ्यास करून इतिहासलेखन, इतिहास संशोधन करणात आपली सर्व हयात खर्ची घातली आहे. या इतिहास संशोधकांमध्ये डॉ.वि.गो.खोबरेकर यांचे स्थानही महत्त्वाचे आहे.

डॉ.खोबरेकर यांना मोडी लिपीचे उत्तम ज्ञान अवगत होते. मराठयांच्या इतिहासाची मुख्य साधने म्हणजे मोडी कागदपत्रे होय. डॉ.खोबरेकर हे मोडीचे जाणकार असल्याने अप्रकाशित साधनांचा वापर करून अस्सल माहिती उपलब्ध करून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. इतिहास संशोधनासाठी लागणारी विद्वता, चिकाटी इ.गुणांचा सुरेख समन्वय त्यांच्या व्यक्तीमत्त्वात दिसून येतो. त्यांनी आपले आयुष्य इतिहास विषयास वाहून घेतले. त्यांची इतिहास संशोधनातील कामगिरी उल्लेखनीय आहे. बिकानेर येथील राजस्थानच्या दप्तरखान्यातील मराठयांच्या इतिहासाला उपयुक्त वास्तव सामग्रीची माहिती करून

घेण्यासाठी ते गेले होते. तेथे त्यांनी फारसी अखबारांचे अवलोकन केले. हा इतिहास मराठयांच्या इतिहासासाठी उपयुक्त होता हे त्यांनी निदर्शनास आणले. यावरून इतिहास संशोधनासाठी आवश्यक असणारी सूक्ष्म निरीक्षणशक्ती त्यांच्या ठिकाणी होती हे स्पष्ट होते.

डॉ.वि.गो.खोबरेकर यांचे नाव मराठ्यांच्या इतिहासाशी अभेद्यपणे जोडले गेले आहे. मराठा इतिहास लेखनातील पूर्वग्रहदोषांच्या बाबतीत ते नेहमी सतर्क राहून चर्चा करीत असलेले दिसून येतात. जेम्स लेन यांनी शिवाजी महाराजांच्या पितृत्वासंबंधी केलेल्या मजकूराचे त्यांनी वा.सी.बेंद्रेकृत 'मालोजीराजे व शहाजी महाराज' या ग्रंथाचा पुरावा देवून खंडन केले आहे. यावरून पुरावे पडताळून पाहून घटनांचा खरेखोटापणा सिद्ध करण्याची त्यांची क्षमता दिसून येते. डॉ.खोबरेकर यांनी मराठेकालीन महाराष्ट्राचा सर्वांगिण इतिहास लिहिला. यासाठी त्यांनी नव्याने उपलब्ध झालेल्या ऐतिहासिक संदर्भाचा वापर केला. त्यांचे इतिहास संशोधन, इतिहासलेखनशास्त्राला अनुसरूनच होते. वाचन, चिंतन, जिज्ञासा, चिकित्सा या संशोधनाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी त्यांच्या अंगी असल्यामुळे त्यांचे इतिहास संशोधन शास्त्रशुद्ध ठरले आहे. इतिहासाची साधने तपासत असताना मोडी कागदपत्रे, फारसी भाषेतील ग्रंथ, त्यांचे अनुवाद इ. त्यांच्या पाहण्यात आले. ग्रंथाचे चुकीचे वाचन, भाषेचे अपुरे ज्ञान यामुळे निर्माण झालेल्या गैरसमजांवर आपल्या लेखन व संशोधनातून प्रकाश टाकण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले आहे. इतिहास संशोधन हे बौद्धिक कार्य असल्यामुळे इतिहासकारांमध्ये तीक्ष्ण, कुशाग्र बुद्धी आणि चिकित्सक विश्लेषणात्मक वृत्ती असणे आवश्यक असते. ही वृत्ती डॉ.खोबरेकरांमध्ये होती हे त्यांच्या इतिहासलेखनावरून स्पष्ट होते. मराठ्यांच्या इतिहासाचे संशोधन करीत असताना मराठ्यांच्या इतिहासासंबंधी संशोधन व लेखन केलेल्या इतर इतिहासकारांचा चिकित्सात्मक आढावा त्यांनी घेतलेला आहे. हे करीत असताना आपल्या अगोदरच्या व समकालीन इतिहास कारांच्या संशोधनातील चुका

निदर्शनास आणून देवून त्यांच्या मतांचे खंडन करून स्वत:चे निष्कर्ष त्यांनी मांडले आहेत. इतिहासातील सत्य उलगडून दाखवित असताना ते अत्यंत परखड व तसेच प्रसंगी नम्रही राहिलेले आहेत.

डॉ.खोबरेकर यांनी, शिवाजी महाराज आग्रा येथून पलायन करून ते रायगडला पोहोचल्याची योग्य तारीख, राजाराम महाराजांच्या लग्नास संभाजीराजांच्या अनुपस्थितीचे खरे कारण, राजाराम महाराजानंतर कर्ण गादीवर आले नाहीत, शाहू महाराज कालीन अर्थव्यवस्था इ.गोष्टींच्या संदर्भात रियासतकार सरदेसाई, कमल गोखले, सदाशिव शिवदे, डॉ.सिन्हा व मोगल इतिहासकार यांच्या लेखनाचा चिकित्सात्मक आढावा घेवून त्यांच्या चुकीच्या मतांचे खंडन केले आहे व खरा इतिहास मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यावरून उपलब्ध साधनांची बारकाईने पाहणी करून, सर्व तंत्रांचा वापर करून सत्य घटनांचा शोध घेण्याची क्षमता त्यांच्या ठिकाणी होती हे स्पष्ट होते. याबरोबरच संदर्भ सांधनांचे परीक्षण व पुराव्याची सत्यता पडताळून पाहण्याची शास्त्रीय वृत्तीदेखील त्यांच्यामध्ये होती हे त्यांनी केलेल्या स.म.गर्गे यांच्या 'करवीर रियासत' या ग्रंथाच्या परीक्षणावरून सिद्ध होते. यामध्ये डॉ.खोबरेकर म्हणतात, ''सन १७४० च्या सुमारास नानासाहेब पेशवे व संभाजी महाराज यांचा दोन्ही राज्ये (सातारा व कोल्हापूर) एक करण्यासंबंधी गुप्त करार झाला होता असे गर्गे म्हणतात परंतु करार झाल्यासंबंधीच्या अस्सल कागदाचा उल्लेख कुठेच नसल्यामुळे असा करार झालाच होता का.. याबद्दल जबरदस्त शंका आहे.'' अशाप्रकारे उपलब्ध असलेल्या साधनांसंबंधी त्यांच्या मनात संशय निर्माण झाला आहे. परंतु योग्य त्या ठिकाणी डॉ.खोबरेकर इतर इतिहासकारांशी सहमतही झालेले आहेत.

डॉ.खोबरेकर यांनी इतिहास संशोधनाच्या प्रक्रियेतून मराठयांच्या इतिहासातील सर्व घटनांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. मराठयांच्या इतिहासातील जी काही वादग्रस्त स्थळे त्यांना दिसली ती त्यांनी आपल्या संशोधनाच्या माध्यमातून स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. मराठयांच्या इतिहासातील गैरसमजूती त्यांनी उपलब्ध साधन साहित्याचे वाचन

आणि त्यांचा अन्वयार्थ लावण्याच्या प्रक्रियेतून नाहीशा करण्याचा प्रयत्न केला. मराठयांच्या इतिहासाचे संशोधन करताना इतिहासकाळातील परिस्थिती, रूढी, परंपरा व नीतीमूल्यांचे भान ठेवूनच त्यांनी ऐतिहासिक व्यक्ती व घटनांचे मूल्यमापन केले. म्हणूनच त्यांच्या इतिहासलेखनातून शिवचरित्र व संभाजी चरित्र यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते.

डॉ.खोबरेकर यांचे इतिहास संशोधन हे इतिहासाच्या विविध प्रकारांना स्पर्श करणारे आहे. मराठयांची उत्तरेतील राजवट, मराठे रजपूत संबंध, मराठ्यांचा माळव्यातील इतिहास अशा मराठयांच्या राजकीय उलाढाली व ऐतिहासिक संबंध सांगणारे प्रत्येक प्रांताचे इतिहास लिहिले पाहिजेत असे त्यांचे मत होते. त्यांनी स्वत: 'गुजरातेतील मराठी राजवट' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यामुळे मराठ्यांच्या गुजरातेतील कर्तृत्वाचा व राजकीय घडामोडींचा अभ्यास करणे शक्य झाले आहे. हा ग्रंथ लिहून त्यांनी प्रांतिक इतिहासामध्ये भर घातली आहे. याबरोबरच कोकणला मोठा प्राचीन इतिहास आहे हे लक्षात घेवून त्यांनी कोकणचा राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास लिहिला. यामधून ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे अभ्यासकांना अस्सल माहिती उपलब्ध करून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. खोत पद्धत ही कोकणातील रत्नागिरी जिल्हयात चालू होती असा समज आहे. ठाण्याच्या कल्याण प्रांतात व कुलाबा जिल्हयातही पेशवाईत खोत असल्याचे डॉ.खोबरेकर यांनी पुण्यातील पेशवे दप्तरातील खोतीसंबंधीची कागदपत्रे अभ्यासून सिद्ध केले आहे.

कोकणचा इतिहास हा दुर्लक्षिलेला भाग आहे. म्हणून डॉ.खोबरेकर यांचा कोकणच्या इतिहासलेखनाचा केलेला प्रयत्न स्तुत्य आहे. असे डॉ.अ.रा.कुलकर्णी म्हणतात. डॉ.खोबरेकरांचा 'कोकणचा इतिहास' हे प्रादेशिक इतिहासाच्या क्षेत्रात मोडतात. प्रादेशिक इतिहास लिहिताना त्या प्रदेशाचा सखोल, सर्वकष अभ्यास करावा लागतो. त्यामुळे कोकणच्या इतिहासाच्या लेखनावरून डॉ.खोबरेकर यांचा

इतिहासविषयक दृष्टिकोन किती व्यापक होता याची कल्पना येते. या लेखनामुळे मराठेकालीन कोकणच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक घडामोडींचा धावता आलेख इतिहास अभ्यासकांसमोर आलेला आहे. कोकणचा दुर्लक्षित सर्वागिण इतिहास लिहिण्याची त्यांची धडपड विचारात घेवून भाऊसाहेब वर्तक फौंडेशन ट्रस्टने त्यांना पुरस्कार दिला तसेच कोकण मराठी साहित्य परिषदेनेही 'कोकण साहित्य भूषण' पुरस्कार देवून त्यांचा गौरव केला आहे. 'मराठयांच्या स्वाऱ्यांचे मुक्काम' हा ग्रंथ लिहून मराठयांच्या स्वाऱ्यांच्या मुक्कामाची दुर्मिळ माहिती देण्याचे कार्यही डॉ.खोबरेकर यांनी केले आहे. या माहितीवरून मराठयांच्या ठिकठिकाणाच्या कर्तबगारीचा बोध होतो. मुक्कामांची संपूर्ण सूची एकत्रितपणे देण्याचे कार्य डॉ.खोबरेकर यांनी केले आहे.

डॉ.खोब्रेकर यांनी मराठयांचा तपशीलवार इतिहास लिहिला. नि:पक्षपातीपणा व निकोप दृष्टी हे इतिहासकाराकडे आवश्यक असणारे गुण त्यांच्या लेखनात प्रकर्षाने दिसून येतात. मराठयांच्या इतिहासाचे विवेचन करताना त्यांच्या उणीवांकडेही वाचकांचे लक्ष वेधले आहे. पेशव्यांचे व्यापाराकडे लक्ष नव्हते, विज्ञानाकडे त्यांनी दुर्लक्ष केले हे त्यांनी स्पष्ट केले आहे. परंतु त्यांच्या इतिहासलेखनामध्ये काही ठिकाणी व्यक्तीनामाध्ये फरक असल्याचे दिसून येते. त्रैकुटक वंशाच्या 'व्याघ्रसेन' राजाचा उल्लेख त्यांनी 'त्यागसेन' असा केला आहे. कोकणच्या इतिहासाला त्यांनी गरजेपेक्षा जास्त महत्त्व दिल्यासारखे वाटते. तर शिवाजी महाराजानंतर महाराज नावास शोभणारा अखिल मराठेशाहीत 'महादजी शिंदे' हा एकच पुरूष झाला असेल असे डॉ.खोबरेकर म्हणतात. त्यावेळी त्यांनी माधवराव पेशव्यांचे कर्तृत्व विचारात घेतले नाही असे वाटते. पाणिपतच्या तिसऱ्या युद्धात राखीव सैन्याचा अभाव असल्याने मराठयांचा पराभव झाला असे खोबरेकर म्हणतात. परंतु ज्या पद्धतीने मराठयांचे युद्ध पुढे चालले होते (गोलाकार युद्धपद्धत) त्या पद्धतीत राखीव सैन्यास काहीही जागा नव्हती.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

डॉ.खोबरेकर यांच्या इतिहासलेखनात अशाप्रकारे दोष असले तरी मराठयांच्या इतिहासातील अनेक दुवे त्यांनी नमूद केल्यामुळे त्यांचे ग्रंथ लक्षणीय ठरले आहेत. त्यात केवळ राजकारणालाच महत्त्व न देता समाज, अर्थव्यवस्था यावरदेखील त्यांनी भर दिला आहे. परंतु मराठ्यांच्या सामाजिक इतिहासलेखनाची अजूनही आवश्यकता आहे हे डॉ.खोबरेकर नम्रपणे कबूल करतात.

मराठ्यांच्या इतिहासाबरोबरच 'आधुनिक महाराष्ट्रा'च्या इतिहास लेखनामध्येही डॉ.खोबरेकर यांचे कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी संदर्भसाहित्यांचे खूप वाचन करून महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढयाचा इतिहास लिहिला. इ.स.१८५७ च्या उठावापूर्वी महाराष्ट्रात लहान मोठे उठाव झाले. त्यामध्ये आदिवासी, भिल्ल, कोळी इ. जमातींनी इंग्रजी राजवटीविरूद्ध प्रदिर्घ लढा दिला. या लढयाची इतिहासाने योग्य तेवढी घेतलेली नाही. या दुर्लक्षित राहिलेल्या एका महत्त्वाच्या पर्वाची दखल डॉ.खोबरेकर यांनी आपल्या इतिहासलेखनाद्वारे घेतलेली आहे. महाराष्ट्रातील स्वातंत्र्यलढ्याचा सर्वंकष इतिहास त्यांनी सोप्या भाषेत रोचकपणे सांगितला आहे. हा इतिहास सांगताना, विश्वासार्ह पुराव्यातून गतकाळाचे जे चित्र त्यांच्या मनात तयार झाले ते वस्तुनिष्ठपणे अभ्यासंकापुढे मांडण्याची तटस्थ वृत्ती त्यांच्या ठिकाणी होती असे दिसून येते. ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीबरोबरच योग्य तेथे त्यांच्या औदार्याचे वर्णनही त्यांनी केले आहे. समाजातील तळागाळातील जनसमूहांची स्वातंत्र्य लढ्यातील कार्याची माहिती देवून त्यांनी परंपरागत इतिहास लेखनास छेद दिला आहे.

आधुनिक काळात इतिहासाला शास्त्रीय बैठक प्राप्त झाल्यामुळे 'नो डॉक्युमेंट नो हिस्ट्री' असे म्हटले जाते. म्हणजे ज्याच्या आधारावर इतिहासलेखन करावयाचे असते ती इतिहास साधने म्हणजे इतिहासाचा आत्मा होय. म्हणून इतिहास लेखनात साधनांच्या संकलनालाही महत्त्वाचे स्थान आहे. मराठयांच्या व आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास अस्सल साधनांच्या सहाय्याने लिहिला पाहिजे या ध्येयाने प्रेरित होवून डॉ.खोबरेकर यांनी

विपुल ऐतिहासिक साधनसामग्री अभ्यासकांना उपलब्ध करून दिली आहे.

मराठयांच्या इतिहासावर भरपूर प्रकाश टाकू शकणारे साहित्य मोडी लिपीमध्ये आहे. दप्तरखान्यातील या ऐतिहासिक कागदपत्रांचा अभ्यास फाईलींची यादी वाचून करणे अत्यंत त्रासदायक, वेळ काढू आणि फार मोठया श्रमाचा असतो. श्रम आणि काळ यांचा अपव्यय न करता आपल्या विषयाचे कागद अभ्यासकांना सहजासहजी उपलब्ध व्हावेत यासाठी डॉ.खोबरेकर यांनी पुणे, कोल्हापूर, मुंबई या ठिकाणी असलेल्या मोडी कागदांचे सूचीकरण केले. त्यामुळे दप्तरात न जाता घरबसल्या या सूची खंडाचा वापर अभ्यासकांना करता येवू लागला आहे. त्यांनी प्रकाशित केलेली 'मराठेकालीन प्रसिद्ध व्यक्तींची हस्ताक्षरयुक्त पत्रे' ही मराठ्यांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक इतिहासाचे प्राथमिक साधन आहे. तसेच त्यांनी प्रकाशित केलेले 'हुतात्मा चाफेकरांचे आत्मवृत्त' व 'महाराष्ट्र अर्काईव्हज बुलेटिन्स' ही आधुनिक महाराष्ट्राबरोबरच आधुनिक भारताच्या इतिहासाचीही महत्त्वाची साधने आहेत. 'तारीखे दिल्कुशा' हा मूळचा फारसी भाषेतील ग्रंथ इंग्रजी भाषेत प्रसिद्ध करून त्यांनी अमराठी इतिहास अभ्यासकांना इतिहासाभ्यासाचे नवीन दालन उघडून दिले. शिवकालीन कागदपत्रांद्वारे मराठयांच्या इतिहासाची नवीन माहिती प्रकाशित झाली आहे.

अशाप्रकारे डॉ.खोबरेकर यांनी प्रकाशित केलेली ऐतिहासिक साधनसामुग्री इतिहासकारांना मार्गदर्शक ठरणारी आहेत. लेखनकार्य, प्रकाशनकार्य आणि संकलनकार्य या विविध क्षेत्रातील त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. त्यांचे हे कार्य विस्तृत व महत्त्वाचे आहे. त्यांनी तयार केलेली ऐतिहासिक कागदपत्रांची सूची तर अमोलिक आहे. महाराष्ट्रातील विविध दप्तरखान्यातील कागदपत्रांची सूची तयार करण्याची त्यांची योजना पाहिल्यास ते किती दृढनिश्चयी होते हे लक्षात येते. ऐतिहासिक साधनसामुग्रीच्या प्रकाशनाबरोबरच त्यांनी ही ऐतिहासिक साधनसामुग्री जेथे उपलब्ध होते अशा महाराष्ट्रातील विविध दप्तरखान्यांबद्दलही माहिती दिली आहे. ही दप्तरखाने

ऐतिहासिक साधनांनी भरलेली असल्याने अभ्यासूंच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. यांतील साधनांच्या उपलब्धतेशिवाय इतिहासग्रंथांची इमारत उभी होत नाही. डॉ.खोबरेकर यांनी महाराष्ट्रातील विविध दप्तरखान्यातील कागदपत्रांचे स्वरूप, विषय यांची तपशीलात माहिती देवून संशोधकांना दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन केले आहे. डॉ.खोबरेकर हे महाराष्ट्र राज्याच्या पुराभिलेख विभागाचे सहाय्यक संचालक होते. या पदावर असताना त्यांनी सर्व दप्तरखान्यात असलेला पत्रसंभार, त्यावर आधारित प्रसिद्ध झालेले संशोधकीय ग्रंथ व दप्तरखाने राखावयाचे तंत्र याबद्दलची माहिती आत्मसात केली. त्यासाठी त्यांचा महाराष्ट्रातील दप्तरखान्यांशी निकटचा संबंध आला. त्यामुळे दप्तरखान्यांविषयी त्यांनी दिलेली माहिती ही अनुभवाने मिळविलेली आहे. त्यामुळे ती विश्वसनीय आहे. याबरोबरच त्यांनी दप्तरखान्यातील कागदपत्रांची व्यवस्था कशी असावी, याचे तंत्र सांगून दप्तरखान्यांमध्ये जतन करून ठेवलेली ऐतिहासिक साधने ही जागतिक संस्कृतीचा वारसा आहे याची जाणीव आपल्याला करून दिली आहे.

डॉ.खोबरेकर यांचे इतिहास संशोधन व लेखन अभ्यासकांना मार्गदर्शक ठरणारे आहेच त्याबरोबरच इतिहासाचे साक्षीदार असणाऱ्या पुराणवस्तूंचे संरक्षण करण्याबाबत त्यांनी मांडलेले विचारही महत्त्वाचे आहेत. देशातील पुरातन व ऐतिहासिक कलावस्तूंचे जतन व संरक्षण संघटितरित्या व्हावयास हवे असे त्यांचे मत होते. यामधून इतिहास जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न स्पष्ट होतात. पुराणवस्तु व ऐतिहासिक कागदपत्रे जतन करण्याबाबत त्यांनी केलेले मार्गदर्शन हे त्यांच्या दूरदृष्टीपणाचे द्योतक आहे.

प्रचंड बुद्धीमत्ता व कष्ट करण्याची तयारी असल्यामुळेच डॉ.खोबरेकर यांना ऐतिहासिक क्षेत्रात मोलाची कामगिरी करता आली. इतिहासलेखन व संशोधनाबरोबरच इतिहास ज्ञान जोपासण्याची त्यांनी केलेली इतर कार्येही महत्त्वाची आहेत. त्यांनी मद्रास, बिकानेर, पाटणा, लखनौ, दिल्ली, तंजावर, गोवा, त्रिवेंद्रम या ठिकाणी असलेल्या महाराष्ट्र इतिहास साधनांचे निरीक्षण व अवलोकन केले. इ.स.१९७२ च्या मॉस्को येथील सातव्या

आंतरराष्ट्रीय पुराभिलेख परिषदेच्या अधिवेशनास ते उपस्थित होते. तेथून परतताना त्यांनी लंडनला उतरून तेथील कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाराजांसंबंधी कागदपत्रांचा शोध घेतला. त्यामुळे शाहू महाराजासंबंधी अधिक माहिती उपलब्ध होवू शकली. डॉ.खोबरेकर यांनी अनेक इतिहास परिषदांत भाग होवून आपले संशोधित निबंध वाचले. अनेक विषयांवर चर्चासत्रे आयोजित केली. निवृत्तीनंतरही ते आपला पूर्ण वेळ इतिहास संशोधन कार्यासाठी देत असत. मंडळातर्फे त्यांनी मोडी लिपी शिक्षणाचे वर्ग सुरू केले तसेच पोस्ट ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी संशोधनाचे प्राथमिक धडे त्यांनी व्याख्यानाद्वारे दिले. त्यांच्या या कष्टामुळेच त्यांना अनेक मानसन्मान व पुरस्कार मिळाले.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.